**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2018 रोजी भरलेल्या माहे नोव्हेंबर 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01 दिनांक 20 मार्च 2018** | **इतिवृत्त** - दिनांक 24 ऑगस्ट 2018 (भाग 1). |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 02 दिनांक 20 मार्च 2018** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03 दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | ऐरोली विभागातील प्र. क्र. 22, से-9 दिवागांव हनुमान मंदिराशेजारी येथे ग्रामपंचायत कालीन शाळा व लगतच्या भुखंडावर बहुउद्देशीय इमारत बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 14/08/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/1778/2018 |
| **ठराव क्र. 699. दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "ऐरोली विभागातील प्र.क्र. 22, से-9 दिवागांव हनुमान मंदिराशेजारी येथे ग्रामपंचायत कालीन शाळा व लगतच्या भुखंडावर बहुउद्देशीय इमारत बांधणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 73 लाख, 40 हजार 15 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **प्रशासनाकडे परत** |
| **विषय क्र. 04 दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार विभागीय चौकशीअंती श्री. प्रकाश भालचंद्र कुलकर्णी, उपकर निर्धारक व संकलक (निलंबित) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-56(2)(ह) मध्ये नमूद "पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशाप्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे" या प्रस्तावित शास्तीवर निर्णय घेणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-6/प्र.क्र.फ-646/2379/2018 |
| **ठराव क्र. 700. दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार विभागीय चौकशीअंती श्री. प्रकाश भालचंद्र कुलकर्णी, उपकर निर्धारक व संकलक (निलंबित) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-56(2)(ह) मध्ये नमूद "पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशाप्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे" या प्रस्तावित शास्तीवर निर्णय घेणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सदर प्रकरणातील गैरवर्तनाकरीता अपचारी यांना "पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशाप्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे" या प्रस्तावित शास्तीबाबत अंतिम निर्णय घेणेसंदर्भातील प्रस्तावास, संदर्भ क्रमांक 2 बाबत पत्राच्या अनुषंगाने सुचविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभेस सादर होणेस." |
| **निर्णय** | **स्थगित** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 05**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णांलयामध्ये विविध प्रकारचे रुग्णालयीन लिनन शिलाई सहित तीन वर्षे कालावधीकरीता पुरवठा करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/पुरकसेवा-11/6201/2018 |
| **ठराव क्र. 701.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णांलयामध्ये विविध प्रकारचे रुग्णालयीन लिनन शिलाई सहित तीन वर्षे कालावधीकरीता पुरवठा करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, वार्षिक अपेक्षित खर्च रक्कम रू. 98 लाख, 50 हजार 478 मात्र याप्रमाणे तीन वर्षे कालावधीकरिता अपेक्षित खर्च रक्कम रू. 2 कोटी, 95 लाख, 51 हजार 434 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 06**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या तसेच उर्जा व जल संवर्धनाचे उपक्रम राबविण्याऱ्या गृहनिर्माण संस्थांकरीता प्रोत्साहनपर अनुदान योजना लागू करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/उ.आ. (स्व.म.अ.)/380/2018 |
| **ठराव क्र. 702.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या तसेच उर्जा व जल संवर्धनाचे उपक्रम राबविण्याऱ्या गृहनिर्माण संस्थांकरीता प्रोत्साहनपर अनुदान योजना लागू करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील बाब क्र. 1 ते 8 मध्ये प्रस्तावित केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या तसेच उर्जा व जल संवर्धनाचे उपक्रम राबविण्याऱ्या गृहनिर्माण संस्थांकरीता प्रोत्साहनपर अनुदान योजना लागू करणेस, सूचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 07**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | वाशी सेक्टर-8ए व 10ए येथील होल्डींग पॉण्ड वॉक वे लगत स्टेनलेस स्टिल रेलिंग बसविणे व दुरुस्ती करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 20/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/2223/2018 |
| **ठराव क्र. 703.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "वाशी सेक्टर-8ए व 10ए येथील होल्डींग पॉण्ड वॉक वे लगत स्टेनलेस स्टिल रेलिंग बसविणे व दुरुस्ती करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 43 लाख, 68 हजार 696 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 08**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना - 2017 नुसार विक्री प्रक्षेत्र व विक्री शुल्क आकार निश्चित करुन महानगरपालिका क्षेत्रातील ओटले/पिचेस वितरणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/परवाना/1563/2018 |
| **ठराव क्र. 704.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना - 2017 नुसार विक्री प्रक्षेत्र व विक्री शुल्क आकार निश्चित करुन महानगरपालिका क्षेत्रातील ओटले/पिचेस वितरणासाठी उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावाबत नमुद केलेल्या बाबीसह, पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम - 2014, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम - 2016 आणि पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना - 2017 यांचे अंमलबजावणीसाठी पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना - 2017 मधील अनुच्छेद क्रमांक-4 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 386 नुसार मा.महापालिका सर्वसाधारण सभेची मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **स्थगित** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 09**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टीटीसी औदयोगिक क्षेत्रातील शिवाजी फलोअर मिल येथुन ऐरोली टी जंक्शन येथे जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधणीचे कामास सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 31/10/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/2284/201 |
| **ठराव क्र. 705.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टीटीसी औदयोगिक क्षेत्रातील शिवाजी फलोअर मिल येथुन ऐरोली टी जंक्शन येथे जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधणीचे कामास सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 11 कोटी, 64 लाख, 79 हजार 765 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 10**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र हागणदारी मुक्त ODF+ घोषित करणे तसेच शहरास कचरा मुक्त शहराचे स्टार रेटींग प्राप्त करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 01/11/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/ उ.आ. (स्व.म.अ.) /413/2018 |
| **ठराव क्र. 706.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018** | "स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र हागणदारी मुक्त ODF + घोषित करणे तसेच शहरास कचरा मुक्त शहराचे स्टार रेटींग प्राप्त करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र हागणदारी मुक्त ODF + घोषित करण्यास व शहर ODF++ करण्याकरीता पुढील कार्यवाही करण्यास तसेच नवी मुंबई शहरास कचरा मुक्त शहराचे प्रस्तावित 4 स्टार मानांकन **या ऐवजी** प्रथमत: 3 स्टार व त्यानंतर 4 स्टार प्राप्त करण्याकरीता पुढील कार्यवाही करण्यास, सूचविण्यात आलेल्या सुधारणेसह मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **सुधारणेसह मंजूर** |

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी

माहे 20 नोव्हेंबर 2018 ची सर्वसाधारण सभा

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. मीरा संजय पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई शहरात मालमत्ता कराचा प्रश्न गंभीर स्वरुप धारण करु लागला आहे.नवी मुंबई शहराचे दायित्व आजही महापालिका,सिडको आणि एमआयडीसी अशा प्राधिकरणाकडे विखुरले गेलेले आहे.त्यामुळे मालमत्ता कराबाबत सुसुत्रता पहावयास मिळत नाही.नवी मुंबई शहराची निर्मिती ही येथील आगरी कोळी समाजबांधवाच्या जमीनीवर झाली असुन या मुळ भुमीपुत्रांच्या मुळ गावठाणातील इमारतीतील घरे,विस्तारीत गावठाणातील घरे,गरजेपोटी घरपटटीवर बांधलेली घरे याबाबतही मालमत्ता कराबाबतचा प्रश्न प्रलंबितच आहे.असंख्य ग्रामस्थांच्या घरांना आजही प्रशासनाकडुन टॅक्स पावत्याही देण्यात आलेल्या नाहीत.एमआयडीसी कार्यक्षेत्रातील कंपन्या-कारखाने यांच्याकडुनही मालमत्ता कर वसुलीबाबत पालिका प्रशासनाकडुन गांभिर्य व सातत्य न बाळगले गेल्याने त्यांचाही थकीत मालमत्ता कर हा कोटयावधीच्या घरात गेला आहे. महापालिका प्रशासनाने मालमत्ता कर वसुलीबाबत प्रारंभापासुन सातत्य व ताठर भुमिका घेतली असती तर थकीत मालमत्ता कराची समस्या निर्माण झाली नसती.संध्या मंदीचे वातावरण ,बेरोजगारी,स्पर्धा पाहता एमआयडीसीतील कारखानदार, उदयोजक यांना एकरकमी मालमत्ता कराचा भरण्धा करणे शक्यच नाही.<br>मालमत्ता कराच्या जाचामुळे संबंधिताने आपल्या आस्थानेला टाळे लावल्यास मोठया संख्येने मजुर बेराजगारही होण्याची भिती आहे.निवासी परिसरात विचार केल्यास अनेक गृहनिर्माण सोसायटयांध्ये आजही मालमत्ता कर एकत्रितच येत आहे.सदनिकांधारकांच्या नावे स्वतंत्ररित्या वितरण झालेले नाही.त्यामुळे कोणी किती मालमत्ता कर भरावा यावरुन वादंग होवुन मालमत्ता कर थकला आहे. गावठाण, शहर, एम.आय.डी.सी. आणि निवासी परिसरात महापालिका प्रशासनाची मालमत्ताकराची कोटयावधी रुपयांची थकबाकी आहे.ही थकबाकी एकाच टप्प्यात वसुल होणे शक्य नाही.मालमत्ता कराबाबत जे थकबाकीदार असतील त्यांचा 'अभय' योजनेत समावेश करुन त्यावरील व्याज माफ करण्यात यावे आणि थकीत मालमत्ता कर भरण्यास संबंधितांना महापालिका प्रशासनाने थोडा अवधी देवुन टप्प्याटप्प्याने त्यांना मालमत्ता कर भरण्याची सवलत दयावी.त्यामुळे थकबाकीदार व महापालिका प्रशासन यांच्यातील वाद संपुष्ठात येवुन सुसंवाद निर्माण होई आणि महापालिकेच्या तिजोरीतही वाढ होईल. वरील परिच्छेदामध्ये व्यक्त केलेल्या मतांची अंमलबजावणी करणे. | 14<br>नोव्हेंबर | 707<br>20/11/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली मधील अनंत नगर येथील M.S.E.B ट्रान्सफार्मरपासुन म्हात्रे आळी येथील बौध्द विहारापर्यंतचा रस्ता खराब झाला आहे. त्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 15<br>नोव्हेंबर | 708<br>20/11/2018 | मंजूर |
| 3. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेची गेली 17 वर्षे शहर अभियंता पदावर कार्यरत असणारे श्री मोहन बळवंत डगांवकर साहेब दिनांक 31/10/2018 रोजी सेवा निवृत्त झालेले आहेत. दिनांक 30/10/2018 रोजीच्या महासभेमध्ये त्यांच्या अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मा.महापौर साहेब, मा.उपमहापौर मॅडम, मा आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्यांनी त्यांच्याबददल गौरवौदगार काढुन त्यांनी नवी मुंबई शहरासाठी दिलेल्या योगदानाबददल प्रशंसा केलेली आहे व त्यांचा उचित सन्मान होण्यासाठी महानगरपालिके तर्फे त्यांना नवी मुंबई भुषण पुरस्कार देऊन सन्मानित करणे. | 16<br>नोव्हेंबर | 709<br>20/11/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका रहिवाशी क्षेत्रामध्ये ब-याच प्रमाणात नव्याने बांधकाम झालेले असल्याने सदर बांधकाम धारकाकडे मालकी हक्काची व इतर कागद पत्राच्या अभावी सदरील घरास नळजोडणी मिळत नसल्याने तेथील नागरीकांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे.सबब सदर घराकरीता एम.एस.ई.बी च्या धर्तीवर मागेल त्यास वीजपुरवठा देण्यात येतो.तशाच पध्दतीने मानवतेच्या दृष्टीकोनातुन कोणताही नागरीक पाण्यापासुन वंचित राहु नये याकरीता मागेल त्यास तात्पुरत्या स्वरुपाची नळ जोडणी देण्यात यावी.जेणेकरुन नागरीकांस पाणीपुरवठा करण्यात येईल .तसेच नवीन नळ जोडणी दिल्यामुळे महानगरपालिकेच्य उत्पन्नात देखील वाढ होईल.तसेच बेलापुर विभागात पुर्व कालावधी पासुन असलेल्या मंदीराकरीता धार्मिक कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात नळ जोडणी करणे. | 33<br>नोव्हेंबर | 711<br>20/11/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.96,नेरुळ,सेक्टर-16 छत्रपती संभाजी राजे उदयानात नव्याने हिरवळ व झाडे झुडपे लावुन सुशोभिकरण करणे. | 34<br>नोव्हेंबर | 712<br>20/11/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.96, नेरुळ,सेक्टर-16ए, भुखंड क्र.150 व 151 येथील मैदानाचे लाल माती,बेंचेस व इतर सुविधा उपलब्ध करुन सुशोभिकरण करणे. | 35<br>नोव्हेंबर | 713<br>20/11/2018 | मंजूर |
| 7. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.96,नेरुळ,सेक्टर-18 येथील उदयानाला नामफलक बसविणे. | 36<br>नोव्हेंबर | 714<br>20/11/2018 | मंजूर |
| 8. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.51 अंतर्गत सेक्टर-12 मधील मयुर अपार्टमेंट येथे हायमास्ट लावणे. | 40<br>नोव्हेंबर | 715<br>20/11/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.51 अंतर्गत सेक्टर-12 येथील सर्व फुटपाथची नव्याने दुरुस्ती करणे. | 41<br>नोव्हेंबर | 716<br>20/11/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.80 मधील परिसर झोपडपटटीचा आहे.हया परिसरात सर्वत्र मध्यम वर्गीय नागरीक वास्तव करत असतात.येथील नागरीकांना खाजगी हॉस्पीटल न परवडणारी आहेत.प्रभागातील लोक संख्या दहा हजारापेक्षा जास्त आहे. येथील दिवसेन दिवस वाढत असलेल्या लोकसंख्या लक्षात घेता नागरीकांच्या आरोग्याचा सुखसुविधेकरीता प्रभागात नागरी आरोग्य केंद्र उभारणे. | 42<br>नोव्हेंबर | 717<br>20/11/2018 | मंजूर |
| 11. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.80 औदयोगिक परिसरातील डी ब्लॉक मध्ये मोठया प्रमाणात शोरुम,गॅरेज,सर्विस सेंटर आहेत. आज रोजी येथील रस्ते,गटारे ,फुटपाथ यांची खुपच दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर जागोजागी खडडे असुन रस्त्याची अक्षरशा चाळणी झाल्याचे दिसत आहे. रस्त्यात खडडा की खडडयात रस्ते हे पण समजत नाही. तरी येथील औदयोगिक डी ब्लॉक परिसरातील रस्ते,गटार,फुटपाथ बनविणे. | 43<br>नोव्हेंबर | 718<br>20/11/2018 | मंजूर |
| 12. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.80 येथील एल.पी. नाका जक्शन येथे बाहेर गावी जाणा-या सर्व वाहनांचा मोठा बस थांबा आहे.या ठिकाणी मोठया संख्येत नागरीक प्रवास करत असतात.प्रवाशांच्या सुखसुविधेकरीता सुलभ शौचालय व प्रवाशी निवारा शेड बांधणे. | 44<br>नोव्हेंबर | 719<br>20/11/2018 | मंजूर |

| | |
|---|---|
| **तांतडीचे का. क्र. 137.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | स्थायी समितीच्या शुक्रवार, दिनांक 26 ऑक्टोबर 2018 चा ठराव क्र.225 :-<br>"संदर्भ :- आयुक्तांचे दिनांक 10/10/2018, चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशासन/ आस्था-10/घबांअ/2384/2018<br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाच्या रकमेत सुधारणा करणेबाबत च्या प्रस्तावातील अट क्र.1 मध्ये अग्रिम मंजूर करतेवेळी अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा नियुक्ती नंतर प्रस्तावित किमान 5 वर्ष ऐवजी 3 वर्षाची सेवा झाली असली पाहिजे. अट क्र. 2 मध्ये नमुद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सेवेमध्ये फक्त एकदा या ऐवजी दोनवेळा अग्रिम अनुज्ञेय करणेस, अट क्र.5 मध्ये नमुद केल्यानुसार पती, पत्नी दोघेही नवी मुंबई महानगरपालिका सेवेत असली तरीही त्यापैकी एकालाच या ऐवजी दोघांनाही घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय करणेस, तसेच यासाठी प्रस्तावित व्याजदर रु.15 लक्ष पर्यतच्या अग्रिम रक्कमेवर 8.50% व रु. 50 लक्ष पर्यतच्या अग्रिम रकमेवर 10.50% ऐवजी पुर्वी प्रमाणेच म्हणजे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1088, दि.08/02/2010 अन्वये निश्चित केल्याप्रमाणे 6.25 टक्के, 6.75 टक्के व 7.25 टक्के असे ठरविण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबीसह घरबांधणी अग्रिम रकमेची मर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्तावास मंजुर करुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **ठराव क्र. 720.**<br>**दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाच्या रकमेत सुधारणा करणेबाबतच्या प्रस्तावातील अट क्र.1 मध्ये अग्रिम मंजूर करतेवेळी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा नियुक्ती नंतर प्रस्तावित किमान 5 वर्ष ऐवजी 3 वर्षाची सेवा झाली असली पाहिजे. अट क्र. 2 मध्ये नमुद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सेवेमध्ये फक्त एकदा या ऐवजी दोनवेळा अग्रिम अनुज्ञेय करणेस, अट क्र.5 मध्ये नमुद केल्यानुसार पती, पत्नी दोघेही नवी मुंबई महानगरपालिका सेवेत असली तरीही त्यापैकी एकालाच या |

| | |
|---|---|
| | ऐवजी दोघांनाही घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय करणेस, तसेच यासाठी प्रस्तावित व्याजदर रू.15 लक्ष पर्यंतच्या अग्रिम रक्कमेवर 8.50% व रू. 50 लक्ष पर्यंतच्या अग्रिम रकमेवर 10.50% ऐवजी पुर्वी प्रमाणेच म्हणजे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1088, दि.08/02/2010 अन्वये निश्चित केल्याप्रमाणे 6.25 टक्के, 6.75 टक्के व 7.25 टक्के असे ठरविण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबीसह घरबांधणी अग्रिम रकमेची मर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्तावास, मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी देण्यात यावी. " |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 138. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | स्थायी समितीच्या शुक्रवार, दिनांक 26 ऑक्टोबर 2018 चा ठराव क्र.226 :-<br>"संदर्भ :- आयुक्तांचे दिनांक 11/10/2018, चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशासन/ आस्था-10/2392/2018<br>"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, शासन निर्णयातील तरतूद नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांस लागू करणेस व त्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका सेवेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर रुजू झालेल्या व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेचे सभासद असलेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचे 10 वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना निधन झाल्यास त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अथवा त्याच्या कायदेशीर वारसास रु.10 लक्ष सानुग्रह अनुदान अधिक कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेली संचित रक्कम अदा करणेकरीता प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्याबाबींसह मंजुर करुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **ठराव क्र. 721. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "शासन निर्णयातील तरतूद नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांस लागू करणेस व त्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका सेवेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर रुजू झालेल्या व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेचे सभासद असलेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचे 10 वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना निधन झाल्यास त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अथवा त्याच्या कायदेशीर वारसास रू.10 लक्ष सानुग्रह अनुदान अधिक कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेली संचित रक्कम अदा करणेस, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 139. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "पर्यावरण तदर्थ समितीच्या सभेचा दिनांक 31 ऑक्टोबर 2018 रोजीचा ठराव क्र. 2 , संदर्भ - मा.आयुक्ताचे दिनांक 31/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/1659/2018 "<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2017-18 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल. |
| **ठराव क्र. 722. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2017-18 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालमध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.<br>1. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नाल्यामुळे होणाऱ्या वायू प्रदुषणावर नियंत्रण ठेवणे तसेच एमआयडीसी क्षेत्रामधील कंपन्यांचे पाण्याचा योग्य रित्या निचरा करणे, नमुंमपा क्षेत्रातील होल्डींग पॉण्डची साफसफाई वेळो वेळी करण्यात यावी आणि नवी मुंबई परिवहन उपक्रमांतर्गत गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत 32% सीएनजीचा वापर कमी झाला असून 30% डिझेलचा वापर वाढल्यामूळे वायू प्रदुषणात वाढ झाली आहे व नमुंमपा कार्यक्षेत्रात हवा गुणवत्ता परिक्षणाकरीता फिरत्या पर्यावरण प्रयोगशाळेच्य व्हॅनची पाहणी केली असता सदर व्हॅन 8 ते 10 वर्ष कार्यतरत असून सध्यास्थितीत नादुरुस्त अवस्थेत आहे तरी सदर |

| | |
|---|---|
| | व्हॅनची नितांत आवश्यकता असल्या मुळे नवीन व्हॅन लवकरात लवकर खरेदी करण्यात यावी.<br>2. नवी मुंबई महानगरपालिकेने VOC मोजमाप करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या ऐवजी अत्याधुनिक TVOC मोजमाप घेण्यात यावे. तसेच स्वच्छता मोहिमेअंतर्गत शैचालयाची देखभाल योग्य पध्दतीने होत नाही. परिणामी तेथील घाणीमुळे प्रदुषणात वाढ होत असून त्यांची देखभाल दुरूस्ती करण्यात यावी, तसेच नमुंमपाच्या संकेतस्थळावरील तापमान घटक प्रथम पानावर दर्शवावा. आणि नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात वातावरणात PM10 या धुलीकरणाचे प्रमाण ऐरोली परसिरात 1.6 पटीने, तुर्भे परिसरात 1.5 पटीने तर कोपरखैरणे परिसरात 1.4 पटीने वाढले असून त्यावर उपाय योजना करावी.<br>3. नवी मुंबई कार्यक्षेत्रातील अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवरीच संख्या पर्यावरण अहवालात नमूद करण्यात यावी तसेच मोबाईल टॉवरच्या रेडीएशनमुळे होणा-या आजारांची माहिती देखील अहवालामध्ये देण्यात यावी. जास्त प्रमाणात वायू प्रदुषण असणा-या परिसरात ऑक्सीजन देणारी झाडे लावून त्याची माहिती अहवालात नमूद करण्यात यावी. तसेच नवी मुंबई क्षेत्रातील एमआयडीसी परिसरातील कंपन्यांच्या पाण्याचे महाराष्ट्र प्रदुषण मंडळ यांनी दिलेल्या चाचणीचे अहवाल व त्या अहवालानुसार काय कार्यवाही केली त्याची माहिती पर्यावरण अहवालात देण्यात यावी.<br>4. नवी मुंबई कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी योग्य ती उपययोजना करण्यात यावी. तसेच नवी मुंबई क्षेत्रातील वायुप्रदुषणावर रोख बसविण्यासाठी हवा शुध्दीकरणाचे अत्याधुनिक यंत्र बसविणे आणि नवी मुंबई क्षेत्रातील सर्व तलावात गणपती विसर्जन व दुर्गा विसर्जन यानंतर पाणी दुषीत होते त्यामुळे त्या पाण्याच्या दुर्गंधीमुळे सभोवतालच्या रहिवाशांना त्रास होतो. सदर तलावाची वेळोवेळी साफसफाई करण्यात यावी असे प्रस्तावात, नमूद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 140.<br>दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रासंबंधी समग्र धोरणामध्ये बदल करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/11/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/स.वि.वि./2018/2018. |
| **ठराव क्र. 723.<br>दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रासंबंधी समग्र धोरणामध्ये बदल करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, बाब क्र 1 व 2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुळ धोरणातील अटींमध्ये बदल करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 141.<br>दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | महापालिका सचिव विभागाकरीता Risograph Digital Duplicator/Copy Printer मशीनसाठी इंक कार्टेज व मास्टर रोलचा पुरवठा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्ताचे दिनांक 01/11/2018 चे पत्र जा.क्र.नमुंमपा/मस/6794/2018. |
| **ठराव क्र. 724.<br>दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "महापालिका सचिव विभागाकरीता Risograph Digital Duplicator/Copy Printer मशीनसाठी इंक कार्टेज व मास्टर रोलचा पुरवठा करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महापालिका सचिव विभागासाठी इंक कार्टेज |

| | |
|---|---|
| | मास्टर रोलचा पुरवठा उपलब्ध करून घेणेसाठी आगामी दोन वर्षासाठी दरकरार करणेसाठी निविदा मागविण्यास व अंदाजित खर्च रक्कम रू. 40 लाख मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 142. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरावरील राज्य दरसुची (SSR for year 2018-19) वापरणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 17/11/2018 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./2383/ 2018. |
| **ठराव क्र. 725. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरावरील राज्य दरसुची (SSR for year 2018-19) वापरणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिकेकरिता दरसूची सन 2018-19 CSR (Current Schedule Rate) लागू करण्यास या प्रमाणेच वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या SSR (State Schedule Rate) मधील निर्देशानुसार CSR (Current Schedule Rate) बनवून मा. आयुक्त यांच्या मंजूरीने लागु करण्यास, सूचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 143. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | बहुउददेशिय इमारतीचे अंतर्गत व्यवस्थापन व परिचलनाचे बहुउददेशिय काम कंत्राटी तत्वावर करणेच्या प्रस्तावाबाबत. आयुक्तांचे दिनांक 19/11/2018 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/मालमत्ता/3398/2018. |
| **ठराव क्र. 726. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "बहुउददेशिय इमारतीचे अंतर्गत व्यवस्थापन व परिचलनाचे बहुउददेशिय काम कंत्राटी तत्वावर करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, तक्ता क्र. 1 व 2 मध्ये नमूद केलेल्या उक्त मंगळ कार्यालयाकरीता काळजी वाहक (Care Taker) नेमणेकरिता वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रस्ताव मागविणे व कमीत-कमी परिचलन खर्च नमूद करणाऱ्या निविदाकारासमवेत प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्याच्या अटीवर 5 वर्ष जागा उपलब्ध करून देण्याचे अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांना प्रदान करणेस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 प्रमाणे संविदा करणेस, सूचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **तांतडीचे का. क्र. 144. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | वाशी सेक्टर-11 जुहुगांव येथील जुनी नागरी आरोग्य केंद्र इमारत तोडुन तळमजला अधिक चार मजल्याची डॉक्टर्स निवासस्थान इमारत बांधणेच्या प्रस्तावाबाबत. आयुक्तांचे दिनांक 19/11/2018 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./2385/2018. |
| **ठराव क्र. 727. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "वाशी सेक्टर-11 जुहुगांव येथील जुनी नागरी आरोग्य केंद्र इमारत तोडुन तळमजला अधिक चार मजल्याची डॉक्टर्स निवासस्थान इमारत बांधणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 5 कोटी, 12 लाख, 40 हजार 638 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तांतडीचे का. क्र. 145. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | कोपरखैरणे सेक्टर-22,प्लॉट नं.7 व 8 येथील जुनी इमारत तोडुन नवीन माता बाल संगोपन रुग्णालय (MCH) बांधणे प्रस्तावाबाबत. आयुक्तांचे दिनांक 19/11/2018 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ./2386/2018. |
| **ठराव क्र. 728. दिनांक 20 नोव्हेंबर 2018.** | "कोपरखैरणे सेक्टर-22,प्लॉट नं.7 व 8 येथील जुनी इमारत तोडुन नवीन माता बाल संगोपन रुग्णालय (MCH) बांधणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 9 कोटी, 79 लाख, 27 हजार 744 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**